# ६. कुटुंबाचे निवासस्थान

६.१ घराची संकल्पना आणि ओळख
६.२ घरांचे प्रकार
६.३ घरासाठी जागेची निवड

**तुम्हाला आठवतंय का?**
१. मानवाच्या मूलभूत गरजा कोणत्या?
२. निवासस्थान (घर) कोणती मूलभूत गरज पूर्ण करते?

तुम्ही तुमच्या शालेय जीवनामध्ये असे शिकला आहात की मानवाच्या काही मूलभूत गरजा असतात. मानवाच्या जगण्यासाठी त्या आवश्यक असतात. या गरजा म्हणजेच अन्न, वस्त्र आणि निवारा. या गरजांव्यतिरिक्त शिक्षण, स्वच्छ आणि आरोग्यपूर्ण वातावरण अशा गरजा देखील सांगितल्या आहेत. परंतु मूलभूत गरजा बदलल्या नाहीत. ‘घर’ निवारा ही गरज पूर्ण करते.

**खालील गोष्टींकडे लक्ष द्या :**

- घर या संज्ञेमधून एखादी विशिष्ट इमारत दर्शविली जाते. ती कुटुंबाकडील एक भौतिक वस्तू असून महत्त्वाची गुंतवणूक असते.
- घर ही अशी जागा आहे की जिथे व्यक्ती शब्दश: जगते. कुटुंबातील व्यक्तींना त्यांच्या घराबाबत खूप भावनिक जवळीक असते.
- घर ही गरज पूर्ण करण्यासाठी तयार घर विकत घेता येते, जमीन (प्लॉट) विकत घेऊन त्यावर घर बांधून घेता येते किंवा घर भाड्याने घेता येते. यापैकी कोणती पद्धत वापरावी याचा निर्णय कौटुंबिक गरजा आणि आर्थिक क्षमता यावर अवलंबून असतो.

## ६.१ घराची संकल्पना आणि महत्त्व :

**तुम्हाला माहीत आहे का?**
घर कोणकोणत्या गोष्टी पुरविते?

**१. भौतिक सोयी :** भौतिक सोयी विचारात घेऊन खालील तक्ता, दिलेले मुद्दे एका वाक्यात स्पष्ट करून पूर्ण करा :

| | |
|---|---|
| • निवारा पुरविणे | |
| • नैसर्गिक घटकांपासून संरक्षण | |
| • समाज विघातक घटकांपासून संरक्षण | |
| • भौतिक आणि वैयक्तिक गरजांची पूर्तता | |

आदर्श घर कुटुंबातील व्यक्तींना निवारा पुरविते. वातावरणातील घटक जसे-ऊन, वारा, पाऊस, प्रदुषणकारी घटक इत्यादींपासून कुटुंबाला संरक्षण आवश्यक असते. तसेच कुटुंबाला समाज विघातक घटक जसे चोरी करणाऱ्या किंवा त्रास देणाऱ्या व्यक्तींकडून देखील संरक्षण आवश्यक असते. घर हे असे स्थान आहे की जेथे सर्व शारीरिक गरजा जसे-विश्रांती घेणे, झोपणे, खाणे, तयार होणे, वैयक्तिक गरजांची पूर्तता करणे इत्यादी पूर्ण केल्या जातात. कुटुंबातील सदस्यांचे आरोग्य, आरामदायीपणा आणि सुरक्षितता राखण्यासाठी याची मदत होते.

**२. अनुकूल, भावनिक वातावरण पुरविणे :** घर हे असे स्थान आहे की जे भावनिकदृष्ट्या चांगले वातावरण पुरविते, जिथे कुटुंबातील सदस्य एकत्र येऊन त्यांचे दररोजचे अनुभव आणि भावना जसे आनंद, दु:ख इत्यादींची एकमेकांबरोबर चर्चा करतात.

**नेहमी लक्षात ठेवा की :**

काही मूलभूत मूल्ये जसे-सहकार्य, आधार, प्रेरणा देणे, वैयक्तिक विचारांमधील फरकांचा आदर करणे इत्यादींचा कुटुंबातील सदस्यांमध्ये विकास होतो आणि व्यक्तीच्या भावनिक (मानसिक) विकासामध्ये त्याची मदत होते.

**३. बौद्धिक विकासासाठी अनुकूल वातावरण पुरविणे :** घर हे असे स्थान आहे की जेथे व्यक्तीच्या बौद्धिक क्षमतांच्या विकासासाठी तिला प्रेरणा, आधार, प्रोत्साहन आणि मार्गदर्शन दिले जाते. उदाहरणार्थ : कुटुंबामध्ये मुलाला किंवा मुलीला शास्त्रोक्त संगीत, नृत्य शिकणे, रेखाचित्रे काढणे किंवा चित्रकला अशा क्षमतांचा विकास करण्यासाठी प्रेरणा दिली जाते.

**तुम्ही आठवू शकता का?**
तुमच्या कौटुंबिक जीवनामधील एखादे उदाहरण द्या.

**४. सामाजिक विकासासाठी अनुकूल वातावरण पुरविणे :** मनुष्य हा समाजप्रिय प्राणी असून एकाकीपणे राहू शकत नाही. घर हे असे स्थान आहे की जेथे सामाजिक विकास सुरू होतो. इतरांशी कशा प्रकारे संवाद साधावा हे शिकविणारा पहिला समूह म्हणजे कुटुंब होय.

**आपण चर्चा करू :**
कुटुंबामध्ये सामाजिक विकास कसा घडून येतो?

हळूहळू मूल शेजारी पाजारी, नातलग आणि घरामध्ये येणारे मित्र-मैत्रिणी यांच्या बरोबर संवाद साधण्यास शिकते. अशा संवादांमधून मुले समाजामध्ये मान्य होईल असे वर्तन शिकते आणि त्यांना समाजात वावरण्याच्या चांगल्या सवयी लागतात. आसपासच्या परिसरामधील सामाजिक उपक्रमांमध्ये आणि समुदायामधील सण साजरे करण्याच्या प्रसंगांमध्ये सहभागी होऊन व्यक्तीचा विकास घडून येतो.

**५. आर्थिक सुरक्षितता पुरविणे :** मालकी हक्काचे घर असणे ही कुटुंबाची एक उत्तम गुंतवणूक आहे. मालमत्तेचे स्थान (ती कोठे आहे) आणि तिथे पुरविल्या जाणाऱ्या सुखसोयी या घटकांवर अवलंबून कालांतराने मालमत्तेच्या किमती वाढत जातात. बँक, पोस्ट ऑफिस इत्यादींच्या स्वरूपातील गुंतवणुकीपेक्षा येथे जास्त परतावा दिला जातो. कुटुंबातील आर्थिक अडीअडचणीच्या वेळी घराचा काही भाग भाडेतत्त्वाने देऊन पैसा उभा करता येतो. तसेच कोणत्याही आर्थिक मदत देणाऱ्या कंपनीकडे घर गहाण ठेवून रक्कम उभी करता येते.

## ६.२ घरांचे प्रकार :

**घरांचे विविध प्रकार पाहिल्याचे तुम्हाला आठवते का?**
संपूर्ण जगामध्ये घरांचे विविध प्रकार आढळून येतात. सर्वसाधारणपणे वापरल्या जाणाऱ्या संज्ञा जसे - कॉटेजेस, स्टुडिओ अपार्टमेंट फ्लॅट्स, प्लॉट्स, रो हाऊसेस, बंगले, पेंट हाऊस इत्यादींचे अर्थ वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळे असू शकतात.

धड्याच्या या घटकामध्ये आपण भारतीय परिस्थितीमध्ये त्यांचे अर्थ पाहू.

**अ. कॉटेजेस :** ही संज्ञा आपल्या देशामध्ये सामान्यपणे वापरली जाते आणि ती इंग्लंडमध्ये उदयास आली. ही संज्ञा अशी रचना दाखविते की ज्यामध्ये तळमजल्यावर वावरण्याच्या खोल्या असतील आणि वरच्या मजल्यावर एक किंवा दोन झोपण्याच्या खोल्या असतील. सर्वसाधारणपणे, हे एक छोटेसे एक मजली घर असते परंतु काही वेळा मोठ्या रचना देखील आढळून येतात आणि त्यांना देखील कॉटेजेस असे संबोधले जाते. आधुनिक काळामध्ये जुन्या पद्धतीच्या, नम्रता आणि उबदारपणा अशा भावना दर्शविणाऱ्या आणि सर्वसाधारणपणे ग्रामीण किंवा ग्रामीण भागाकडे झुकणाऱ्या गावांमध्ये आढळणाऱ्या रखना या संज्ञेमधून दर्शविल्या जातात. ऐतिहासिक दृष्ट्या, हे एक लहान घर असते. ज्याचे छप्पर गवत किंवा तत्सम वनस्पती साहित्य वापरून बनविलेले असते. तसेच यांच्या भिंती जाड असतात आणि दगड किंवा विटांनी बांधलेल्या असतात. सध्याच्या काळात, सुटीच्या काळात वापरले जाणारे छोटेसे घर या संज्ञेमधून सांगितले जाते.



**कॉटेज हाऊस**

**ब. स्टुडिओ अपार्टमेंट :** स्टुडिओ अपार्टमेंट किंवा स्टुडिओ फ्लॅट हा अगदी छोटा झोपण्याची वेगळी खोली नसलेला फ्लॅट असतो. सध्याच्या काळात, आपल्या कुटुंबापासून नोकरीच्या निमित्ताने लांब राहणाऱ्या तरुण पिढीमध्ये हा प्रकार लोकप्रिय होत आहे. अशा लोकांची, एका छताखाली सर्व सोयी पुरविल्या जाणाऱ्या आरामदायी घराची इच्छा असे फ्लॅटस् पूर्ण करतात. असे फ्लॅटस्, अशा नोकरी करणाऱ्या व्यक्ती भाड्याने घेतात. स्टुडिओ फ्लॅटमध्ये एकच खोली असते जी विविध भागांमध्ये विभाजित केलेली असते परंतु त्यांच्यामध्ये भिंती किंवा तत्सम प्रकारचा अडथळा नसतो. त्यामुळे व्यक्ती ही खोली विविध क्रिया पार पाडण्यासाठी वापरते. जसे – झोपणे, करमणूक करणे, स्वयंपाक करणे इत्यादींसाठी म्हणजेच तिचा उपयोग झोपण्याची खोली, बैठकीची खोली, स्वयंपाकघर म्हणून केला जातो.



स्टुडिओ अपार्टमेंट

**क. फ्लॅट्स (सदनिका) अपार्टमेंट :** फ्लॅट या संज्ञेचा साधा सोपा अर्थ असा सांगता येईल की, फ्लॅट म्हणजे सर्व सोयी अंतर्भूत असलेला घराचा प्रकार जो इमारतीमधील केवळ काही भाग व्यापतो. भारतामध्ये, अनेक फ्लॅट्स असलेल्या इमारतीला अपार्टमेंट असे म्हटले जाते. फ्लॅट म्हणजे इमारतीमधील जागा जी कुटुंब राहण्यासाठी वापरते. कुटुंबातील सदस्यांना अनेकविध क्रिया आरामदायकपणे पार पाडता याव्यात यासाठी ही जागा अनेक लहान लहान भागांमध्ये विभागली जाते. अशा क्रियांमध्ये पाहुण्यांची करमणूक करणे, कुटुंबाने समूह म्हणून एकत्र बसणे, वैयक्तिक गरजा पूर्ण करणे, झोपणे (विश्रांती घेणे), तयार होणे, अभ्यास करणे, स्वयंपाक करणे, खाणे इत्यादींचा समावेश असतो. या गरजा विचारात घेतल्या तर आपल्या असे लक्षात येते की, फ्लॅटमध्ये बैठकीची खोली, झोपण्याची खोली, स्वयंपाकघर, अभ्यासाची खोली, स्वच्छतागृह इत्यादी खोल्या असतात. आपले उत्पन्न, कुटुंबातील सदस्यांची संख्या, कुटुंबाचा प्रकार (विभक्त किंवा एकत्र) इत्यादी घटकांचा विचार करून कुटुंब एक बेडरूमचा, दोन बेडरूमचा किंवा तीन बेडरूमचा फ्लॅट घेण्याचा विचार करेल.



फ्लॅट/अपार्टमेंट

**ड. रो हाऊसेस :** रो हाऊसेस म्हणजे एकाच कुटुंबासाठी असलेले, परस्परांना एका सामायिक भिंतीने जोडलेले घरांचे प्रकार होत. सर्वसाधारणपणे ते शहरी भागांमध्ये आढळून येतात. त्यांचे स्वरूप एक मजली किंवा बहुमजली असते. ते दोनच्या जोडीमध्ये किंवा दोनापेक्षा अधिक संख्येमध्ये आढळून येतात. अशा घरांची रचना, दृश्यस्वरूप आणि संरचना तंतोतंत असू शकत नाही परंतु त्यांच्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर साम्य असते. या घरांसमोर आणि मागच्या बाजूला मोकळी जागा असते जी बगिचा करणे, पार्किंगची जागा, किंवा कुटुंबाला सोयीस्कर वाटेल अशा कोणत्याही कारणासाठी वापरली जाते.



रो हाऊसेस

**इ. पेंट हाऊसेस :** इमारतीच्या (अपार्टमेंट बिल्डिंगच्या) छतावर बांधलेले छोटे आणि पूर्णपणे स्वतंत्र असलेले घर दर्शविण्यासाठी पेंट हाऊस ही संज्ञा वापरली जाते. याचा सोपा अर्थ असा आहे की ते इमारतीच्या सर्वोच्च मजल्यावर असते. वास्तूस्थापत्य शास्त्रामध्ये ही संज्ञा अशी संरचना दर्शविते की जी इमारतीच्या छतावर असते आणि जी गच्चीच्या कठड्याला (पॅरापेटला) जोडलेली नसते. अशी घरे छतावरील संपूर्ण जागा व्यापत नाहीत आणि अशी न व्यापलेली जागा बसण्याची व्यवस्था करण्यासाठी, झाडांच्या कुंड्या ठेवणे इत्यादी गोष्टींसाठी वापरली जाते. सर्वसाधारणपणे या घरांचे छत उंच असते, स्वतंत्र लिफ्टद्वारे गच्चीमध्ये जाण्यासाठी सोय केलेली असते आणि आजूबाजूच्या परिसराची विस्तृत दृश्ये पाहणे शक्य होत असते.

सामान्यपणे ही घरे मोठी आणि खूप महाग असतात. या घरांसाठी सर्व सुविधा उपलब्ध असतात जसे खूप किमती उपकरणे, सुबक आणि उच्च प्रतीचे साहित्य आणि फिटिंग्ज, उच्च प्रतीच्या फरशा, गच्ची, जास्त मोठी (मोकळी) जागा, खूप मोठ्या खिडक्या इत्यादी.



पेंट हाऊस

**फ. बंगले :** सर्वसाधारणपणे बंगला हे छोटे, चौरस, एक मजली आणि सर्व-चारही बाजूंना मोकळी जागा असलेले घर असते, सामान्यपणे या रचनांना पोर्च असतो आणि वर जाण्यासाठी समोरून पायऱ्या असतात. भारतामध्ये बंगल्यांचा विकास केला गेला कारण कॉटेज पद्धतीची जाड भिंती असलेली घरे येथे अनुरूप ठरली नाहीत. बंगला ही संज्ञा भारतीय शब्द 'बांगला' यावरून तयार केली गेली आणि तिचा संबंध एकोणविसाव्या शतकामध्ये बंगालमध्ये बांधलेल्या



घरांशी जोडला गेलेला आहे. ही घरे प्रशस्त असून त्यांचा प्रवेश व्हरांड्यामधून दिलेला असतो. पूर्वीच्या काळामध्ये अशा घरांना उतरते. छप्पर असायचे आणि त्यामध्ये एखादी छोटी खिडकी (स्काय लाईट विंडो) बसविलेली असे. या शतकामध्ये देखील गावांमध्ये आणि छोट्या शहरांमध्ये उतरत्या छपरांची घरे आढळून येतात. मोठ्या शहरांमध्ये उपलब्ध असलेल्या जमिनीच्या कमतरतेमुळे दुमजली बंगले आढळून येतात. सामान्यपणे बंगल्याच्या समोरच्या बाजूला बगिचा आणि पार्किंगची सोय, मागच्या बाजूला बगिचा आणि वॉशिंग एरिया (धुणी/भांडी करण्याची जागा) आढळून येते आणि त्यासाठी स्वतंत्रपणे प्रवेश दिला जातो.



बंगला

**ग.पर्यावरण अनुकूल घरे (इको फ्रेंडली हाऊसेस) :** या शतकामध्ये पर्यावरणाबाबतची संवेदना वाढत चालली आहे आणि त्याचे पर्यवसान म्हणून पर्यावरण अनुकूल घरे किंवा ग्रीन होम्सची लोकप्रियता वाढते आहे. आपल्या देशातील लोक जाणीवपूर्वक नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरून अधिकाधिक संख्येमध्ये पर्यावरण अनुकूल घरांची निर्मिती करत आहेत. पर्यावरणावरील प्रभाव कमी करण्याच्या दृष्टीने ते बांधकामामध्ये टिकाऊ तंत्रज्ञान वापरात आणत आहेत. अशा घरांमध्ये समाविष्ट असणारी काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे : पाण्याचा पुनर्वापर, खिडक्यांसाठी मोठ्या मोठ्या काचांचा उपयोग, सौर पत्रे, कचरा व्यवस्थापनाच्या प्रभावी पद्धती, पर्यावरणपूरक बांधकाम साहित्याचा उपयोग आणि अक्षय उर्जा स्रोत इत्यादी. या संरचनांच्या निर्मितीचा उद्देश म्हणजे बांधकामामध्ये अशा रचना निर्माण करणे की ज्या पर्यावरणासाठी प्रभावी आणि सुसंगत ठरण्यास मदत करतील आणि पर्यावरणावरील हानीकारक परिणाम कमी करतील.

**इंटरनेट माझा मित्र :**

१. तुमच्या परिसरातील पर्यावरण अनुकूल घर शोधा, त्याला भेट द्या, त्याच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करून अहवाल लिहा.

२. इंटरनेटवरून पर्यावरण अनुकूल घरांची माहिती मिळवून त्यावर अहवाल लिहा.

**तुमच्या बुद्धीचा वापर करा :** खाली दिलेल्या चित्रांमधील घरांचा प्रकार ओळखा आणि दिलेल्या चौकोनामध्ये त्याची वैशिष्ट्ये लिहा.



घराचे नाव :

वैशिष्ट्ये :



घराचे नाव :

वैशिष्ट्ये :



घराचे नाव :

वैशिष्ट्ये :



घराचे नाव :

वैशिष्ट्ये :



घराचे नाव :

वैशिष्ट्ये :

**तुम्हाला माहीत आहे का?**

**सरकारने सुरू केलेली गृहप्रकल्प योजना :**

प्रत्येक व्यक्ती आणि कुटुंबासाठी निवारा ही मूलभूत गरज आहे आणि म्हणूनच प्रत्येकासाठी निदान लहान घर असणे आवश्यक असते. हा उद्देश डोळ्यापुढे ठेवून सरकारने 'प्रधानमंत्री आवास योजना (शहरी भाग)' निर्माण केली ज्याचे ध्येय वाक्य 'सर्वांसाठी घर' असे आहे. या योजनेमध्ये २०२२ सालापर्यंत सर्वांना घर मिळण्याची सुविधा मिळवून देणे अशी सोय आहे. २०२२ सालापर्यंत म्हणजे जेव्हा देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण होतील तोपर्यंत सर्वांना घरकुल मिळावे असा या योजनेचा उद्देश आहे.

**आयसीटीचा उपयोग :**

शहरी भागातील आणि ग्रामीण भागातील कुटुंबासाठी उपलब्ध असलेल्या योजना इंटरनेटवरून शोधून काढा.

## ६.३ घरासाठी जमिनीची निवड :

घरकुल हा कौटुंबिक जीवनाचा महत्त्वाचा भाग जिथे कुटुंबातील सदस्य त्यांच्या आयुष्यातील खूप मोठा वेळ घालवितात. सर्व कौटुंबिक क्रियांचे घर हे केंद्र आहे. घराची खरेदी करणे किंवा ते बांधून घेणे हा कुटुंबाचा फार मोठा निर्णय असतो. ही आयुष्यभराची खूप मोठी गुंतवणूक असते म्हणूनच हा निर्णय अतिशय काळजीपूर्वक घ्यावा लागतो आणि त्यामध्ये कुटुंबातील सर्व सदस्यांना समाविष्ट करावे तसेच तज्ज्ञांकडून योग्य मार्गदर्शन देखील घ्यावे. उपलब्ध घराबाबत खूप माहिती व्यक्तीने गोळा करणे आवश्यक असते जसे – त्याची रचना, भौतिक सुविधा तसेच कुटुंबातील सदस्यांच्या गरजा पूर्ण होतील का इत्यादी. कुटुंबातील सदस्यांना आराम मिळणे तसेच त्यांच्या गरजा पूर्ण होणे हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कुटुंब, आपले घर वारंवार बदलू शकत नाही म्हणून त्याची निवड अतिशय काळजीपूर्वक आणि काही घटक विचारात घेऊन करावी.

### अ) भौतिक घटक :

घरासाठी जमिनीची निवड करताना खालील गोष्टी लक्षात ठेवा :

- प्लॉटवर सीमारेषा अचूकपणे दाखविलेल्या आणि आखलेल्या आहेत का ते तपासून पहावे जेणेकरून भविष्यातील कायदेशीर तंटे आणि बाबी टाळल्या जातील.
- प्लॉटचा आकार नियमित असावा. आयताकृती आकार नियोजनाच्या दृष्टीने चांगला समजला जातो. प्लॉटचा आकार नियमित नसल्यास काही जागा वाया जाऊ शकते.
- प्लॉटला रस्त्याकडे किंचित उतार असावा ज्यामुळे पावसाचे पाणी घराकडून रस्त्याकडे सहजतेने वाहून नेले जाईल आणि घराजवळील जमीन ओली राहून आरोग्यास हानीकारक वातावरण निर्माण होणे टाळले जाईल तसेच घरासाठी ड्रेनेज पाईपलाईन देणे सोपे होईल.
- घर थोड्या उंच जमिनीवर असावे ज्यामुळे आजूबाजूच्या परिसराचे सुंदर दृश्य पहावयास मिळते.
- नैसर्गिक सौंदर्याचा घटक जसे : टेकडी, तलाव इत्यादींचे दृश्य पाहता येईल अशा घराला पसंती द्यावी.
- भरपूर प्रमाणामध्ये हवा आणि प्रकाश येऊ शकेल अशी रचना असावी. जर घराजवळ खूप जास्त प्रमाणात घनदाट झाडी असेल तर प्रकाश आत येण्यास अडथळा निर्माण होतो.

### ब) स्थान :

**ब) स्थान :** घराच्या स्थानाचा अभ्यास काळजीपूर्वक करावा कुटुंब घर भाड्याने घेईल किंवा तयार फ्लॅट विकत घेईल किंवा प्लॉट (जमीन) विकत घेऊन त्यावर घर बांधून घेईल.

**नेहमी लक्षात ठेवा :**
खालील मार्गदर्शके लक्षात ठेवा :

- घर अशा ठिकाणी असावे की, जेथे मूलभूत सोयी उपलब्ध असतील. दळणवळणाच्या चांगल्या सोयी, चांगले रस्ते, बाजार, दवाखाने, शाळा इत्यादी सोयी चालत जाण्याच्या अंतरावर असाव्यात.
- मुले येथे लहानाची मोठी होणार असल्याने चांगला शेजार आणि चांगला परिसर असणे खूप महत्त्वाचे ठरते. या दृष्टिकोनातून, जर घर भाड्याने घेतले असेल आणि कुटुंबाला ते योग्य वाटत नसेल तर तेथून दुसरीकडे जाण्याचा पर्याय असतो; परंतु ते जर स्वत:चे घर असेल तर हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा ठरतो कारण कुटुंब आयुष्यभर येथे राहणार असते.
- कारखान्यांच्या क्षेत्रापासून ते लांब असावे कारण कारखान्यांमधून सोडल्या जाणाऱ्या धुरामुळे हवेचे प्रदूषण घडून येते. तसेच रेल्वे, प्रमुख रस्ते, हमरस्ते यांच्यापासून देखील घर दूर असावे अन्यथा आवाजाच्या प्रदूषणाचा त्रास होतो आणि घराच्या दिशेने कंपने आणली जातात.

**क) जमिनीचा प्रकार :** व्यक्तीने तज्ज्ञांकडून जमिनीचा प्रकार तपासून घ्यावा. यावरून पायाचा (फाऊंडेशनचा) प्रकार ठरविला जातो आणि त्याचा बांधकामाच्या खर्चावर परिणाम होतो. जमिनीच्या/प्लॉटच्या मातीचा प्रकार वेगवेगळा असू शकतो जो खालीलप्रमाणे असू शकतो.

### पूर्ण खडकाळ जमीन :

| फायदे | तोटे |
|---|---|
| • ही जमीन कठीण पाया पुरविते. | • ही जमीन दिवसा तापते आणि रात्री पर्यंत थंड होत नाही, विशेषत: उन्हाळ्यामध्ये. |
| • ही जमीन पाणी शोषून घेत नाही आणि तेथे पाणी साठून राहत नाही. | • जर जमीन खणणे किंवा सपाट करणे आवश्यक असेल तर समस्या निर्माण होतात. |

| फायदे | तोटे |
|---|---|
| | |
| | • बगिचा निर्माण करण्यामध्ये आणि झाडे वाढविण्यामध्ये समस्या निर्माण होतात. |

वर दिलेले तोटे विचारात घेता ही जमीन घराच्या बांधकामासाठी चांगली समजली जात नाही.

**सैल मातीची जमीन :** जमीन सैल मातीची नसावी तसेच ती 'तयार केलेली' किंवा भराव घातलेली नसावी. याचा अर्थ जमीन पूर्वी खड्डा असलेली होती आणि नंतर मलवा घालून तयार केलेली नसावी. अशा जमिनीचे अनेक तोटे आढळतात ते पुढीलप्रमाणे :

- या जमिनीमध्ये पाया तयार करण्यास समस्या येतात.
- जमीन पाणी शोषून घेते आणि दलदलीची होते म्हणून आरोग्यास हानिकारक ठरते.
- अशी जमीन कमी अधिक प्रमाणात खचण्याचा धोका असतो. त्यामुळे ड्रेनेजच्या वाहण्यामध्ये अडथळा निर्माण होऊ शकतो.
- अशा जमिनीवर बांधलेल्या घरांमध्ये भेगा पडणे ही समस्या सर्वसामान्यपणे आढळून येते.

यामुळे ही जमीन घराच्या बांधकामासाठी चांगली समजली जात नाही.

**काळ्या मातीची जमीन :** ही जमीन बगिचा तयार करण्यासाठी चांगली असते परंतु तिचे खालील तोटे आढळून येतात.

- पाया तयार करण्यामध्ये समस्या येतात.
- ती घराच्या बांधकामाला आधार देऊ शकत नाही म्हणून पाया तयार करण्यासाठी उच्च प्रतीचे तंत्रज्ञान 'पाईल फाऊंडेशन' वापरावे लागते जे खर्चीक ठरू शकते.

**घराच्या बांधणीसाठी चांगली जमीन :** जमिनीमध्ये २ ते ५ फूटांच्या खाली कठीण माती, मुरूम किंवा खडक असलेली माती चांगला पाया तयार करते. हा प्रकार खालील फायदे मिळवून देतो :

- ही माती ड्रेनेज पाईप्स देणे सोपे करते.
- बगिचा करण्यासाठी ती चांगली ठरते.
- पाया बांधणे अवघड किंवा खर्चीक नसते.

**ड) आरोग्यदायी वातावरण :** आरोग्यदायी वातावरण पुरविण्याच्या दृष्टिकोनातून घराच्या नियोजनामध्ये काही मुद्दे विचारात घ्यावे लागतील, ते खालीलप्रमाणे :

- घराच्या जवळपास उघडे ड्रेनेज नसावे. नगरपालिका किंवा स्थानिक प्रशासनाने पुरविलेली ड्रेनेज व्यवस्था असावी.
- पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी योग्य रचना केलेली असावी. घराच्या जवळपास पाणी साठून राहू नये.
- घराचा प्लॅन (नकाशा) असा असावा की, जेणेकरून सर्व खोल्या, बाथरूम्स् आणि टॉयलेट्स मध्ये भरपूर उजेड येईल तसेच वायुवीजनही घडून येईल. यासाठी आवश्यक त्या संख्येमध्ये खिडक्या असाव्यात.
- सर्व प्रमुख खोल्यांमध्ये 'क्रॉस' वायुवीजन घडून यावे. सर्व खोल्यांना लागू होणारा नियम म्हणजे खोलीच्या आकारमानाच्या कमीत कमी एक सप्तमांश आकारमान खिडक्यांसाठी असावे आणि बाथरूम्स् आणि टॉयलेट्स-साठी ते अर्धे असावे.

**इ) व्यावहारिक सोयी-सुविधा :** दैनंदिन जीवनामधील क्रिया सुलभतेने करता याव्यात यासाठी विविध सोयी/सेवा आवश्यक असतात ज्या शहराच्या विकसित भागामध्ये पुरविल्या जातात म्हणून नेहमी विकसित भागामधील घराची निवड करावी.

**यादी करा :**
घरासाठी आवश्यक असलेल्या सोयींची यादी करा :

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

घरासाठी खालील सुविधा महत्त्वाच्या समजल्या जातात :

- अतिशय महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या सुविधा म्हणजे वीजपुरवठा, पाणीपुरवठा आणि प्लंबिंग (ड्रेनेज).

या सुविधांच्या उपयोगाशिवाय आयुष्य जगण्याची कोणी कल्पनाही करू शकत नाही. सध्याच्या काळात त्यांच्यावर आपण इतके अवलंबून असतो की काही काळ जरी त्यांचा पुरवठा खंडित झाला तरी आपण अस्वस्थ होतो आणि त्रासून जातो.

- इतर काही सुविधांमध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो : शाळा, कॉलेज, दूरभाष्य आणि इंटरनेट सुविधा, पोस्ट ऑफिस, बँक, अग्निशमन यंत्रणा, हॉस्पिटल्स्, खरेदीची ठिकाणे, मनोरंजनाची केंद्रे, प्रार्थनास्थळे इत्यादी. अशा सर्व सुविधा चालत जाण्याच्या अंतरावर असाव्यात.

## तुम्ही आठवू शकाल का?

- मानवाची निवारा ही गरज घराद्वारे पूर्ण केली जाते.
- घर हे कौटुंबिक जीवनाचे प्रमुख केंद्र असून सर्व कौटुंबिक क्रियांसाठी आधारभूत ठरते.
- आदर्श घर कुटुंबातील सदस्यांना भौतिक सुविधा, अनुकूल भावनिक वातावरण, बौद्धिक वातावरण, सामाजिक वातावरण, आर्थिक सुरक्षितता पुरविते.
- घरांचे विविध प्रकार आहेत जसे कॉटेजेस्, फ्लॅटस्, रो हाऊसेस, बंगले, पेंट हाऊसेस, स्टुडिओ फ्लॅटस्, इत्यादी.
- भारतातील नागरिक पर्यावरणाच्या समस्यांप्रती संवेदनक्षम होऊ लागले आहेत आणि म्हणूनच पर्यावरण अनुकूल घरे आपल्या देशामध्ये अधिकाधिक लोकप्रिय होत आहेत.
- कुटुंब, आपले घर वारंवार बदलू शकत नाही. घर ही आयुष्यभराची गुंतवणूक असते ज्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर पैसे गुंतविलेले असतात आणि म्हणूनच घराची निवड काळजीपूर्वक करावी. घराची निवड करण्यासाठी काही घटक विचारात घेतले जातात. हे घटक म्हणजे भौतिक घटक, स्थान, जमिनीचा प्रकार, आरोग्यदायी वातावरण आणि व्यावहारिक सोयी.

## स्वाध्याय

- **वस्तुनिष्ठ प्रश्न :**

**१) कंसात दिलेल्या शब्दांमधून अचूक शब्द निवडून दिलेली विधाने पूर्ण करा.**

(भाड्याने देणे, कॉटेज, रो हाऊसेस, सैल मातीची जमीन, पेंट हाऊस, इको फ्रेंडली)

१. कुटुंबासाठी घर उपलब्ध करून घेण्यासाठी घर विकत घेणे, बांधून घेणे किंवा ________ घर हे मार्ग आहेत.

२. सुटीतील घर ही संज्ञा साधारणपणे ________ या रचनेसाठी वापरली जाते.

३. एकमेकांना जोडून बांधलेल्या घरांसाठी ________ ही संज्ञा वापरली जाते.

४. अशा प्रकारची माती की जी कमी अधिक प्रमाणात खचू शकते आणि इमारतीमध्ये भेगा निर्माण करू शकते तिला ________ असे म्हणतात.

५. इमारतीच्या छतावर बांधलेल्या घराला ________ असे म्हणतात.

६. पर्यावरणाचे रक्षण करण्याचे उद्दिष्ट ठेवून बांधलेले घर म्हणजे ________ घर होय.

**२) खालील संज्ञांचा अर्थ एका वाक्यात लिहा.**

अ) फ्लॅट क) बंगला
ब) कॉटेज ड) रो हाऊस

- **लघुत्तरी प्रश्न :**

**१) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

अ) घर भौतिक गरजा, भावनिक गरजा आणि बौद्धिक वातावरण पुरविण्याची गरज कशाप्रकारे पूर्ण करते?

ब) व्यक्तीच्या सामाजिक विकासासाठी घर कशाप्रकारे महत्त्वपूर्ण असते आणि घर आर्थिक सुरक्षितता कशाप्रकारे देते ते स्पष्ट करा.

क) बंगला म्हणजे काय? त्यांची वैशिष्ट्ये कोणती?

ड) घराची निवड करताना जमिनीचे कोणते भौतिक घटक विचारात घेतले पाहिजेत?

इ) घराच्या निवडीमध्ये कोणते आरोग्यदायी घटक विचारात घ्यावेत?

फ) घराच्या निवडीमध्ये कोणत्या व्यावहारिक सोयी-सुविधा विचारात घ्याव्यात?

**२) फरक सांगा.**

अ) बंगला आणि रो हाऊस

ब) फ्लॅट्स आणि अपार्टमेंट्स

क) बंगला आणि कॉटेजेस

**३) टिपा लिहा.**

अ) घराच्या निवडीमधील भौतिक घटक

ब) घराचे स्थान

क) घराच्या निवडीमधील व्यावहारिक बाबी

ड) कॉटेजेस आणि बंगले

इ) फ्लॅट्स, रो-हाऊसेस आणि पेंट हाऊसेस

फ) स्टुडिओ फ्लॅट्स आणि इको हाऊसेस

**४) कारणे द्या.**

अ) रस्त्याच्या बाजूला किंचित उतार असलेले घर चांगले समजले जाते.

ब) घराची निवड करताना चांगला शेजार आणि आजूबाजूचे वातावरण विचारात घ्यावे.

- **दीर्घोत्तरी प्रश्न.**

अ) कौटुंबिक निवासस्थानाचे महत्त्व काय? चांगल्या निवास स्थानामधून पूर्ण होणाऱ्या विविध गरजांचे वर्णन करा.

ब) घराच्या निवडीमध्ये विचारात घेतल्या जाणाऱ्या घटकांची यादी करा आणि त्यातील कोणताही एक घटक स्पष्ट करा.

**प्रकल्प/असाईनमेंट**

अ) वर्तमानपत्रे, मासिके, जाहिराती इत्यादींमधून घरांची चित्रे मिळवा. ती कापून नीट चिकटवून स्क्रॅप बुक (वही) बनवा.

ब) तुमच्या घरासाठी उपलब्ध असलेल्या विविध सोयी सुविधांची यादी करा.

क) तुमच्या परिसरामधील एखादे 'इको हाऊस' शोधा. तिथे भेट देण्याचे नियोजन करा आणि त्याच्या विशिष्ट घटकांचा अभ्यास करून त्याबाबतचा अहवाल लिहा.